अध्ययन निष्पत्ती निकषानुसार मराठी विषयाच्या अध्यापनानंतर इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांमधील संपादणूकीचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड साठी

पीएच.डी.पदवीकरिता सादर केल्या जाणा-या

शोध प्रबंधाचा आढावा

संशोधक

प्रा.कु.सरिता आण्णासो मोरे

M.A.(Marathi),M.Ed.,M.Phil.,Set

मार्गदर्शक

डॉ.बालाजी जी.गिरगावकर

M.Sc.(Physics,Maths),M.Ed.,Ph.D.,D.S.M.

सहयोग बी.एड. कॉलेज नांदेड

संशोधन अभ्यास केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शैक्षणिक वर्ष

२०१९ - २०२१

अनुक्रमणिका

अ.नं.	प्रकरणाचे नाव
१	प्रास्ताविक
२	संशोधनाची गरज
३	संशोधनाचे महत्व
४	समस्या विधान
५	समस्येचे स्पष्टीकरण
	५.१ संकल्पनात्मक व्याखा
	५.२ कार्यात्मक व्याखा
६	संशोधनाची उदिष्ट्ये
७	परिकल्पना
८	संशोधनाची गृहीतके
९	संशोधनाची व्याप्ती
१०	संशोधनाची मर्यादा
११	संशोधन पद्धती
१२	संशोधन नमुना निवड
१३	संशोधनाची माहिती संकलनाची साधने व तंत्रे
१४	संशोधनाची चले
१५	संशोधनाची कार्यवाही
१६	संशोधनाचे वेळापत्रक
१७	संशोधन खर्चाचे अंदाजपत्रक
१८	संशोधन अहवाल प्रकरण योजना
१९	संदर्भ ग्रंथ

१. प्रस्तावना :

शालेय अभ्यासक्रम आणि प्रत्यक्ष जीवन यामध्ये नको इतके अंतर पडले आहे. हे सर्वज्ञात आहे. अभ्यासक्रम हा उपयोजित असावा. विद्यार्थीभिमुख आणि विद्यार्थी केंद्री असावा. विद्यार्थी हा परीक्षार्थी न राहता अध्ययनार्थी व्हावा. शिक्षण हे समाजाभिमुख आणि गरजाभिमुख असावे, शिक्षण हे कौशल्याधारित व्हावे. शिक्षण आणि उदरनिर्वाह यांमध्ये पडलेले अंतर कमी व्हावे. शिक्षणातून जीवन जगण्याचे मानसिक आणि आर्थिक पाठबळ मिळावे असे वेगवेगळे सैद्धांतिक विचार आपण आजवर ऐकत आलो आहे. या अनुशंगाने आजही सर्वत्र विचार होत असतो. मात्र आपल्या शालेय शिक्षणाला केवळ उदारमतवादी साच्यातून बाहेर काढून ते जीवनोपयोगी म्हणजेच व्यवहारोपयोगी कसे बनवता येईल याकरिता मार्ग सापडणे कठीण झाले आहे. पण असे काही मार्ग सापडले तरी त्या मार्गाची शिक्षणामध्ये रुजवणूक करणे हे जरा जडच वाटावे अशी स्थिती आहे. याकरिताच एक नवीन मार्ग म्हणून दिल्या जाणा-या शालेय शिक्षणातील निरनिराळया विषयातून विद्यार्थ्याच्या अंगी विविध कौशल्य विकसित होतील यासाठी हाती घेतलेला नवीन एक प्रयत्न म्हणून आपणास अध्ययन निष्पती या संकल्पनेकडे पाहता येईल.

२. संशोधनांची गरज :

अध्ययन निष्पत्ती वर सूतोवाच करण्याअगोदर अध्ययन निष्पत्ती म्हणजे काय हे जाणून घेणे इष्ट आहे. नॅशनल अचिव्हमेंट सर्वे या संघटनेने केलेल्या सर्वेक्षणानुसार देशातील केवळ ४० टक्के विद्यार्थीच अध्ययनानंतर विशिष्ट निष्पत्ती पर्यंत पाहोचतात. इतर विद्यार्थी पोहचू शकत नाहीत. असा निष्कर्ष काढला आहे. यावर उपाययोजना म्हणून एनसीईआरटीच्या मूल्यमापन पद्धतीमध्ये बदल केला गेला पाहिजे असे लक्षात आले. या अनुषंगाने अध्ययन निष्पत्ती ही संकल्पना पुढे आली आहे.

एखाद्या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण शिकवल्यानंतर त्या विद्यार्थ्यात झालेला अपेक्षित वर्तन बदल म्हणजे त्या विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती होय. अध्ययन निष्पत्ती ही त्या-त्या विद्यार्थ्याची त्या त्या विषयातील संपादणूक होय. मात्र संपादणूक या गुळगुळीत संकल्पनेमध्ये परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थ्यांने एकूण किती गुण मिळवले इथपर्यंत आपण आजवर विचार केला आहे. मात्र अध्ययन निष्पत्ती मध्ये मिळवलेल्या ज्ञानाचे विद्यार्थ्यांमध्ये किती आकलन झाले आणि त्या आकलनाचा विद्यार्थी आपल्या जीवनामध्ये किंवा व्यवहारांमध्ये किती प्रमाणात प्रत्यक्ष वापर

करतो. हे तपासून पाहणे अध्ययन निष्पती या संकल्पनेमध्ये येते. उदारणार्थ गणिताची एखादी संकल्पना समजत नसेल आणि अध्ययनानंतर त्याला ही संकल्पना समजू लागली आणि त्या आधाराने त्याने इतर उदाहरणे सोडवली तर त्या विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती झाली असे म्हणता येईल. जर माहिती, ज्ञान आणि शहाणपणा यामधील फरक लक्षात घेतला तर अध्ययन निष्पती ही संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येईल. उदाहरणार्थ पुस्तकातून मिळालेल्या माहितीवर विचार आणि चिंतन घडल्याने जो बोध होतो तो बोध ज्ञान आहे. झालेल्या ज्ञानाचा व्यवहारांमध्ये केलेला वापर हा शहाणपणा आहे. ज्ञान हे सत्यच असते ते खरे असते. जे खरे नसते ते कधीच ज्ञान असू शकत नाही. विद्यार्थ्याला झालेल्या माहितीच्या खरेपणाची पुष्टी म्हणजे ज्ञान होय आणि या ज्ञानाचा जीवन व्यवहारांमध्ये प्रत्यक्ष वापर करता येणे म्हणजे शहाणपणा होय. हा शहाणपणा विद्यार्थ्यांमध्ये यावा. याकरिता अध्ययन निष्पत्ती हा एक प्रयत्न आहे. कारण शिक्षणाने माणूस केवळ माहितीचे भांडार किवा अक्रियावान पंडित पढत मूर्ख व्हावा हि अपेक्षा आता कालपरत्वे मागे पडत आहे. शिक्षणातून क्रियावान व्यक्ती व्हावेत. याकरिता प्रयत्न व्हायला हवेत. यासाठी म्हणून अध्ययन निष्पत्ती संकल्पना प्राधान्यक्रमाने राबवणे ही काळाची गरज आहे.

३. संशोधनाचे महत्व :

प्रत्येक राज्यातील मूल्यमापनाचे निकष आणि पद्धती वेगवेगळ्या आहेत. अध्ययन निष्पत्ती म्हणजे अध्ययनानंतरचे मूल्यमापनाच्या पद्धती व त्याचे निकष हे सर्व देशभरामध्ये एकच असावेत. त्याकरीता अध्ययन निष्पत्ती ही संकल्पना पुढे आली आहे. या अध्ययन निष्पत्ती वर आधारितच पायाभूत चाचण्याची निर्मिती केली जाते.

अध्ययन निष्पतीचे परिणाने वेगवेगळे विषय आणि वेगवेगळ्या इयत्तानुसार वेगवेगळी आहेत. एखादा विषय अभ्यासल्यानंतर त्या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यातील अपेक्षित वर्तन बदल आणि त्या विद्यार्थ्याने कोणकोणत्या अध्ययन निष्पत्ती साध्य कराव्यात, कोणकोणती कौशल्य विकसित करावेत. या संबंधीत अध्ययन निष्पत्ती निकष ही संकल्पना ठरते.

मराठी विषयाकरिता अध्ययन निष्पत्ती मध्ये विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातील बातम्यांचे वाचन केल्यानंतर त्या बातम्यांचे स्वतःच्या शब्दात वर्णन करणे. हे कौशल्य विद्यार्थ्यांच्या अंगी येणे अपेक्षित आहे. तसे ते वेळापत्रकांच्या आणि त्या अनुषंगाने सुद्धा वेगवेगळे आहे.

थोडक्यात वर्गात शिकवलेल्या पाठ्यघटकांचे प्रत्यक्ष जीवनात कसे उपयोजन करावयाचे हे अध्ययन निष्पत्ती ही संकल्पना आपणास शिकवते. शिक्षकांनी अध्ययन निष्पत्ती संकल्पनेच्या निकषानुसार अध्ययन केल्यास अभ्यासक्रमातील पाठ्यघटकांचा प्रत्यक्ष जीवनामध्ये उपयोजित वापर विद्यार्थी करू शकतील अशी अध्ययन निष्पती ही संकल्पना मराठी विषयाच्या संदर्भाने कशाप्रकारे अधिकाधिक पुढे आणता येयील, मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातून कोणकोणत्या प्रकाराची वेगवेगळी कौश्यले विदयार्थ्याच्या अंगी रुजवता येणे शक्य आहे याचा प्रत्यक्ष प्रयोगातून अभ्यास करावा या उदेश्याने संशोधकाने प्रस्तुत विषय संशोधनाकरिता निवडला आहे.

४. समस्या विधान

अध्ययन निष्पत्ती निकषानुसार मराठी विषयाच्या अध्यापनानंतर इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांमधील संपादणूकीचा अभ्यास.

५. समस्येचे स्पष्टीकरण

५.१ संकल्पनात्मक व्याख्या

५.१.१ अध्ययन निष्पत्ती

एनसीआरटी आणि एससीआरटी म्हणजे विद्या प्रदीकरण यांनी दिलेल्या निर्देश्यानुसार अध्यापनानतर विद्यार्थ्यामध्ये अपेक्षित वर्तन बदल घडून आलाच पाहिजे. याकरिता सुचवलेली संकल्पना म्हणजे अध्ययन निष्पती.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
महाराष्ट्र विद्या प्राधिकर, पुणे.
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषद, मुंबई.

५.१.२ मराठी विषय

‘कोठारी आयोगाने सांगितलेल्या शिफारशीमध्ये त्रिभाषा सुत्रापैकी पहिली भाषा म्हणजे मराठी विषय होय.’

५.१.३ इयत्ता सातवी

१९८६ च्या राष्ट्रीय धोरणानुसार १०+२+३ य आकृतिबंधातील इयत्ता ७ वी हा एक उच्च प्राथमिक स्तर ठरला आहे.

५.१.४ अध्यापन

अध्यापन म्हणजे एक अशी प्रक्रिया की, ज्याव्दारे एक व्यक्ती दुस-या व्यक्तीला ज्ञान, कौशल्य व कला संपादन करण्यास मदत करते.

The world Book of Encyclopedia

अध्यापन ही केवळ मदत करणारी क्रिया न राहता प्रत्यक्ष ज्ञान, कौशल्य किंवा अनुदेशन देणारी तसेच अध्ययन कर्त्याला प्रेरणा देणारी अशी क्रिया आहे.

The little Oxford Dictionary

अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी चेतना, मार्गदर्शन, दिग्दर्शन प्रोस्ताहन आहे.

- बर्टन

अध्यापन ही एक द्विकेन्द्री असून त्यापैकी एक बाजूने विशिष्ठ हेतूने नवनवीन माहिती देणे, नवनवीन कोश्यले विकसित करण्याचा प्रयत्न करणे, अध्ययन कर्त्याला प्रेरणा देणे अशा कृती केल्या जातात व कृतीचा परिणाम दुसर्या केंद्रावर होतो. म्हणजेच य कृती विद्यार्थ्याच्या अध्ययनासाठी मार्गदर्शक पूरक व प्रेरणादायी अशा असतात.

५.१.५ संपादणूक

शिक्षकांच्या अध्यापनानंतर आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनानंतर विद्यार्थ्यांनी किती प्रमाणात गुणात्मक आणि संख्यात्मक ज्ञान प्राप्त केले याचे परिणामात्मक मूल्यांकन म्हणजे त्या विद्यार्थ्याची ती संपादणूक होय.

५.२ कार्यात्मक व्याख्या

५.२.१ अध्ययन निष्पती

प्रस्तुत संशोधनामध्ये अध्ययन निष्पत्ती एनसीआरटी आणि एससीआरटी म्हणजेच विद्या प्राधिकरण यांनी दिलेल्या निर्देशानुसार अध्यापनानंतर विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित वर्तन बदल घडून येतील याचा विचार केला आहे.

५.२.२ मराठी विषय

'शालेय अभ्यासक्रमात शिकवला जाणारा एक भाषा विषय.'

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी विषयाचे अध्यापन करून विद्यार्थ्यांमध्ये दिसून आलेल्या अध्ययन निष्पत्तीचा अभ्यास केला जाणार आहे.

५.२.३ इयत्ता सातवी

प्रस्तुत संशोधानामध्ये अध्ययन निष्पती निकषानुसार अध्यापन करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक स्तरावरील इयत्ता सातवीच्या वर्ग निवडला आहे.

५.२.४ अध्यापन

प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थ्यात अपेक्षित वर्तन बदल घडवून आणण्यासाठी शिक्षकांनी हेतुपूर्वक केलेली कृती म्हणजे अध्यापन व अध्ययन निष्पतीच्या निकषानुसार संशोधक उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता सातवीच्या मराठी विषयातील निवडक घटकांचे अध्यापन करणार आहे.

५.२.५ संपादणूक

प्रस्तुत संशोधनात अध्ययन निष्पतीच्या निकषानुसार केलेल्या अध्यापानानातर विद्यार्थ्यामध्ये दिसून आलेल्या अपेक्षित वर्तन बदलांचा अभ्यास केला जाणार आहे.

६. संशोधनाची उद्दिष्टे

६.१ उच्च प्राथमिक स्तरावर इयत्ता सातवीच्या मराठी विषयाच्या पारंपारिक अध्यापन पद्धतीची माहिती घेणे.

६.२ उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता सातवीच्या मराठी विषयाच्या अध्ययन निष्पती निकषानुसार अध्यापनाचे नियोजन करणे.

६.३ उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता सातवी मराठी विषयाच्या अध्ययन निष्पती निकषानुसार अध्ययन करणे.

६.४ मराठी विषयाच्या अध्ययन निष्पती निकषानुसार अध्यापनाची परिमाणकारकता तपासणे.

७. संशोधनाची परिकल्पना

७.१ मुख्य परिकल्पना

इयत्ता सातवीच्या मराठी अध्यापन करण्यासाठी अध्ययन निष्पती निकषानुसार नियोजन करणे.

७.२ शून्य परिकल्पना

७.२.१. अध्ययन निष्पत्ती निकष अध्यापन पूर्व चाचणीत विद्यार्थ्याचा संपादणूकीत कोणताही फरक पडत नसतो.

७.२.२. अध्ययन निष्पती निकषानुसार अध्यापन व विद्यार्थ्याची संपादणूक यामध्ये परस्पर संबंध असतो.

७.३.३. पारंपारिक पद्धतीने मराठी अध्यापन व अध्ययन निष्पती निकषानुसार केलेल्या मराठी अध्यापनातून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपादणूकीत कोणताही फरक पडत नाही.

८. संशोधनाची गृहीतके

१. पारंपारिक पद्धतीने केलेल्या अध्यापनात सर्वच विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन निष्पत्ती दिसून येत नाही.

२. मराठी विषयाच्या अध्यापनासाठी अध्ययन निष्पत्ती निकषानुसार अध्यापानाचे नियोजन करता येते.

३. अध्ययन निश्पत्ती संकल्पना विद्यार्थ्यांच्या भाषा विकासाच्या दृष्टीने आणि परिणामकारक ठरते.

९. समस्येची व्याप्ती व मर्यादा

१. प्रस्तुत संशोधन हे अध्ययन निष्पत्ती निकष या संकल्पनेवर केले जाणार आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे कोल्हापूर जिल्हयातील शाळाचा समावेश असेल.

३. प्रस्तुत संशोधनात प्रत्यक्ष प्रयोगासाठी कोल्हापूर जिल्हयातील पाच शाळाचा समावेश केला जाईल.

४. प्रस्तुत संशोधनात अध्ययन निष्पती संकल्पनेच्या उद्देशाने असलेल्या अध्यापनातील विद्यार्थी संपादणूकीचा अभ्यास केला जाणार आहे.

१० संशोधनाची मर्यादा

१. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा केवळ मराठी माध्यमातील विद्यार्थी करिता मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे इयत्ता सातवीच्या वर्गापुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा केवळ मराठी विषयाच्या अध्ययनापुरते मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे सन २०१९ ते २०२१ या कालावधीत केले जाणार आहे.

११. संशोधनाची पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे. यामध्ये समान गट अभिकल्पाची निवड करून प्रायोगिक पद्धतीने संशोधन केले जाणार आहे.

१२. संशोधनाची जनसंख्या आणि नमुना निवड

१२.१ जनसंख्या

इयत्ता सातवीच्या वर्गातील मराठी विषयाचे अध्ययन करणारे सर्व विद्यार्थी प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

समान गट अभिकल्प - (The equivalent or parallel group design)

१. प्रायोगिक गट

१) प्रायोगिक उपायांची धनमात्रा इतर सर्व परीस्थिती समान

२. नियंत्रित गट

१) प्रायोगिक उपायांचा अभाव इतर सर्व परीस्थिती समान

१२.२ नमुना निवडीची पद्धती

प्रस्तुत संशोधनाकरिता नमुना निवडीचा विविध यादृच्छिक नमुना निवड पद्धती वापरली आहे.

तसेच कोल्हापूर जिल्हयातील शाळामधील पंधरा मराठी विषयाची शिक्षकाची निवड करण्यात येईल.

१२.३ नमूना / न्यादर्श

कोल्हापूर जिल्ह्यातील बारा तालुक्यातील इयत्ता सातवीच्या वर्गात शिकणारे विद्यार्थी म्हणजेच एकूण २०० विद्यार्थी प्रस्तुत संशोधनासाठीचा नमुना असेल.



१३. माहिती संकलनाची साधने व तंत्रे

प्रस्तुत संशोधनात संशोधक प्रश्नावलीचा वापर करेल तसेच पारंपारिक अध्यापनाची माहिती शिक्षकाकडून घेण्यासाठी व विद्यार्थ्याचे अध्ययन संपादनासाठी या प्रश्नावलीचा वापर केला जाईल व अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांचे वर्तन बदल अभ्यासण्यासाठी निरीक्षणसूचीचा वापर केला जाईल

१३.१ संख्याशास्त्रीय साधन तंत्रे

प्रस्तुत संशोधनकरिता

१. टक्केवारी

२. मध्यमान

३. टी-परीक्षिका

या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला जाईल

१४. संशोधनाची चले

शैक्षणिक प्रक्रियेच्या व्यवस्थापन व निरीक्षणानुसार परिणाम करणारा संशोधनातील कोणताही घटक म्हणजे चल होय.

प्रस्तुत संशोधन प्रायोगिक संशोधन पध्दतीने केले असल्याने संशोधकाने चलाची निश्चीती पुढीलप्रमाणे केलेली आहे.

१४.१ स्वाश्रयी चले

१. पारंपारिक अध्यापन

२. अध्ययन निष्पती निकष या मूल्यमापन निकषाव्दारे अध्यापन

१४.२ आश्रयी चले

१. विद्यार्थ्यांचे संपादन

२. विद्यार्थी वर्तन बदल

१४.३ नियंत्रित चले

१. अध्यापन कालावधी

२. मराठी विषयातील निवडक पाठयघटक

३. विद्यार्थ्यी संख्या

१५. संशोधनाची कार्यवाही

प्रस्तुत संशोधनात संशोधक प्रथम कोल्हापूर जिल्हयातील पंधरा शिक्षकांची निवड करून पारंपरिक पद्धतीने ते कशाप्रकारे अध्ययन करतात याची माहिती घेतली जाईल त्यानंतर प्रायोगिक पद्धतीमध्ये समान गट अभिकल्प यामध्ये प्रायोगिक गट व नियंत्रित गट यांची निवड शिक्षकांनी घेतलेल्या पूर्व चाचणीच्या आधारे केली जाणार आहे. यानंतर

नं.	प्रायोगिक गट	नियंत्रित गट
१	पूर्व चाचणी	पूर्व चाचणी
२	प्रायोगिक उपायांची धनमात्रा	प्रायोगिक उपायांचा अभाव
३	अतिम चाचणी ($x_१$)	अतिम चाचणी ($x_२$)

४. दोन गटांना अंतिम चाचणीत मिळालेल्या गुणांची तुलना केली जाणार आहे. यासाठी t-test या सांख्यिकी परिमाणाचा वापर करून सहसंबंध पाहिला जाईल व

विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती निकषांमध्ये वर्तन बदलाची निश्चिती करण्यासाठी निरीक्षण सूचीद्वारे निरीक्षण करून परिणाम अभ्यासला जाणार आहे.

संशोधनाची कार्यवाही

समस्या निश्चिती

आराखडा निश्चिती

आराखडा सादरीकरण

आराखडा अंतिम मंजुरी

संबंधित साहित्याचा आढावा

साधन निवड व निर्मिती

जनसंख्या व नमुना निवड

संशोधन पद्धतीनुसार साधनांच्या साहृयाने माहिती गोळा करणे

माहिती संकलन

निष्कर्ष व शिफारशी

अहवाल लेखन

सादरीकरण

१६. संशोधनाच्या कार्यवाहीची रूपरेषा

अ.क्र.	तपशील	कालावधी
१	संशोधनाचा आराखडा सादर करणे.	जुलै २०१९
२	संशोधनाची साधन निर्मिती करणे.	ऑगस्ट २०१९
३	माहितीचे संकलन करणे.	फेब्रूवारी २०२०
४	माहितीचे विश्लेषण करणे.	एप्रिल २०२०
५	अहवाल लेखन करणे.	जुलै २०२०
६	अहवाल टंकलेखन बांधणी व सादरीकरण	सप्टेंबर २०२०

१७. संशोधन खर्चाचे अंदाजपत्रक

अ.क्र.	तपशील	अपेक्षित खर्च
१	आराखडा निर्मिती	५००
२	प्रश्नसूची निर्मिती	५०००
३	पुस्तक खरेदी	४०००
४	प्रवास खर्च	१००००
५	अहवाल लेखन	२००००
६	अहवाल बांधणी	३०००
७	इतर खर्च	५०००
	एकूण खर्च	४७५००

१८. संशोधन अहवालाचे प्रकरण योजना

प्रकरण १ प्रस्तावना

प्रकरण २ संबंधित साहित्याचा आढावा

प्रकरण ३ संशोधन पद्धती

प्रकरण ४ संशोधित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण ५ सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ सूची

परिशिष्ट

१९. संदर्भग्रंथ

१. आनंद वास्कर, पुष्पा वास्कर (ऑक्टोबर १९९८). 'भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण', नूतन प्रकाशन पुणे

२. करंदीकर सुरेश (मार्च २०००). 'मराठी अध्यापन' पध्दती, कोल्हापूर फडके प्रकाशन.

३. कुंडले म.बा. (१९८५). 'मराठीचे अध्यापन' पुणे श्री विद्या प्रकाशन.

४. दुनाखे अरविंद (फेब्रुवारी २००४). 'मराठीचे आशययुक्त अध्यापन' पुणे, नूतन प्रकाशन.

५. देशमुख एल.जी. (जुलै २०००). 'शिक्षणाचे तत्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान' कोल्हापूर, फडके प्रकाशन.

६. मुळे रा.श. व उमाटे वि.म. (१९९८). 'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे' नागपूर, विद्या प्रकाशन.

७. भिंताडे वि.रा. (१९८९). 'शैक्षणिक संशोधन' पध्दती पुणे, नूतन प्रकाशन.

८. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र - अध्ययन निष्पती उच्च प्राथमिक स्तर

९. ह.ना.जगताप (एप्रिल २००७). 'शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र', नूतन प्रकाशन पुणे

संशोधक
कु.सरिता आण्णासो मोरे

संशोधक मार्गदर्शक
डॉ.बालाजी जी.गिरगावकर